**साक्षीदाराचा पुरावा तेल्हारा, जि. अकोला न्यायालयामधून व्हीडीओ कॉन्फरसींगव्दारे नोंदविण्यात आला.**

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यांचे कार्यालय यवतमाळ**

**सत्र खटला क्र. ८८/२०२४**
**निशाणी क्र. २७**

**महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. यवतमाळ ग्रामीण** **सरकारी अभियोक्ता**
..वि..
किशोर लक्ष्मण इंगळे + ३ **आरोपी.**

| | |
|---|---|
| शासन तर्फे साक्षीदार क्र. ६ | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की – | |
| माझे संपूर्ण नाव | प्रकाश कवडूजी तुनकलवार |
| वय अंदाजे ५८ वर्षे | धंदा– नौकरी, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन तेल्हारा, जि. अकोला. |
| राहणार | रा. तेल्हारा, जि. अकोला |
| **सरतपासणी श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः–** | |

सन २०२३ मध्ये मी पोलीस स्टेशन यवतमाळ ग्रामीण येथे ठाणेदार या पदावर कार्यरत होतो. दिनांक ३१/१०/२०२३ ला फिर्यादी संदिप मेहत्रे यांनी पोलीस स्टेशनला लेखी तक्रार दिली होती व त्यावेळी मी पोलीस स्टेशनला हजर होतो. त्यांच्या लेखी तक्रारीवर मी गुन्हा नोंदविल्याबाबतचा शेरा लिहिला व त्यावर मी सही केली व ती लेखी तक्रार निशाणी क्रमांक १५ वर आहे. त्यानूसार गुन्हा क्रमांक ४२१/२०२३ नोंदविण्यात आला होता. गुन्हा नोंदविल्यानंतर दिनांक १/११/२०२३ रोजी भूजल सर्वेक्षण अधिकारी, यवतमाळ आणि सचिव ग्राम पंचायत किन्ही यांना पंच मिळण्याबाबत पत्र दिले. त्या पत्रांवर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व **ते पत्र अनुक्रमे निशाणी क्रमांक २८ व २९ वर आहे**. त्यानूसार त्या दोन्ही कार्यालयांनी पंच पुरविल्याबाबतचे पत्र मला दिले व ते पत्र निशाणी क्रमांक २६ व **निशाणी क्रमांक ३० वर आहे**. त्यानंतर मी घटनास्थळावर पंचांसह व फिर्यादीसह गेलो. घटनास्थळ हे फिर्यादीने दाखविले. घटनास्थळ हे किन्ही शिवारामधील डॉक्टर सतिष लचके यांचे शेत आहे. त्याठिकाणी शासन आपल्या दारी या कार्यक्रमासाठी सभा मंडप उभे करण्यात आले होते. त्या सभा मंडपाच्या समोरील

भागात शेवटच्या सेक्टरमध्ये घटना घडली. मी घटनास्थळ पंचनामा पंचासमक्ष तयार केला, त्यावर माझी पंचांची सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व तो पंचनामा निशाणी क्रमांक २१ वर आहे.

२. त्यानंतर मी साक्षीदारांची बयाने नोंदविली. तसेच बंदोबस्ताबाबत आदेशाची प्रत पोलीस अधिक्षक कार्यालयामधील विशेष शाखेमधून पत्राव्दारे मागीतली. ते पत्र मला दाखवले, त्यावर माझी सही असून **ते निशाणी क्रमांक ३१ वर आहे** व त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यानूसार त्या बंदोबस्ताचा आदेशाची प्रत मला देण्यात आली होती व ती प्रत आता मला दाखवली व ती प्रत मी दोषारोपपत्रासोबत जोडली होती व ती प्रत आर्टीकल अ वर आहे. आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर झाल्यामुळे त्यांना तात्पुरती अटक करण्यात आली व त्याबाबत अटक फॉर्म तयार करण्यात आले असून त्यावर माझ्या सह्या आहेत व **ते अनुक्रमे निशाणी क्रमांक ३२ ते ३५ वर आहे**.

३. बंदोबस्त आदेशानूसार आम्ही अगोदर पोलीस मुख्यालय, यवतमाळ येथे गेलो व तेथून बंदोबस्ताचे वाटप झाले. त्याबाबत स्टेशन डायरीचा उतारा दाखल केलेला असून त्यावर माझी सही असून **तो उतारा निशाणी क्रमांक ३६ वर आहे**. तपासाअंती मी आरोपींच्या विरोधात दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. आज आरोपी न्यायालयामध्ये हजर आहे.

**<u>उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. पि.पि.किर्दक यांचे मार्फत सुरु –</u>**

४. मी आरोपींची ओळख परेड घेतली नाही. संबंधीत पोलीस अधिकारी व कर्मचारी जे कथित दिनांक ३०/१०/२०२३ रोजीच्या बंदोबस्तामध्ये हजर होते, त्यांच्या ड्युटी पासेस मी या प्रकरणामध्ये दाखल केल्या नाही. अटक व स्थानबध्द करणे यामध्ये फरक आहे. हे म्हणणे खरे आहे की सभा मंडपामध्ये अनेक पोलीस कर्मचारी तैनात होते. हे म्हणणे खरे नाही की त्या पोलीस कर्मचा–यांकडे शस्त्र होते. हे म्हणणे खरे नाही की सभा मंडपामध्ये येण्यासाठी एकच रस्ता होता. हे म्हणणे खरे आहे की सभा मंडपामध्ये अंदाजे ५०० पोलीस कर्मचारी तैनात होते. हे म्हणणे खरे आहे की त्या सभा मंडपामध्ये मोठया प्रमाणात गर्दी होती. हे म्हणणे खरे आहे की तेथे गोपनिय पोलीस कर्मचा–यांची नेमणूक

करण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की गोपनिय कर्मचा–यांकडे त्यांचा गोपनिय कॅमेरा रेकॉर्डींगसाठी होता. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की गोपनिय कर्मचा–यांकडे कॅमेरा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की सभा स्थळी सि.सि.टिव्ही कॅमेरे लावलेले होते. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की सभा स्थळी सि.सि.टिव्ही लावलेले नव्हते.

५. कथित घटनेची नोंद पोलीस स्टेशनच्या स्टेशन डायरीला घेण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की घटना घडलेली नसल्यामुळे त्याची नोंद मी स्टेशन डायरीला घेतली नाही. डॉ. सतिष लचके यांच्या मालकीचे घटनास्थळावरील कथित शेत असल्याचे दस्तऐवज मी दोषारोपपत्रासोबत दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की डॉ. सतिष लचकेच्या शेतामध्ये सभा मंडप होते.

६. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की फिर्यादी संदिपने दिनांक ३१/१०/२०२३ रोजी लेखी तक्रार पोलीस स्टेशनला दिली होती. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की *"त्यावेळी मी पोलीस स्टेशनला हजर होतो, त्यांच्या लेखी तक्रारीवर मी गुन्हा नोंदविल्याबाबतचा शेरा लिहिला व त्यावर मी सही केली व ती लेखी तक्रार निशाणी क्रमांक १५ वर आहे, त्यानूसार गुन्हा क्रमांक ४२१/२०२३ नोंदविण्यात आला होता, गुन्हा नोंदविल्यानंतर दिनांक १/११/२०२३ रोजी भूजल सर्वेक्षण अधिकारी, यवतमाळ आणि सचिव ग्राम पंचायत किन्ही यांना पंच मिळण्याबाबत पत्र दिले".*

७. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे दस्त निशाणी क्रमांक २८, २६, २९ व ३० तयार केले. आमच्या कार्यालयामध्ये पत्रांना आवक जावक क्रमांक लावण्यात येतो व त्यावर दिनांक टाकण्यात येतो. हे म्हणणे खरे आहे की निशाणी क्रमांक ३१ च्या माझ्या पत्रावर जावक क्रमांक नमूद केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा, यवतमाळ यांना पत्र निशाणी क्रमांक ३१ दिलेले नसल्यामुळे त्यावर जावक क्रमांक व तारीख टाकण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी ते पत्र पोलीस स्टेशनमध्ये तयार केले व त्यावर खोटे सही केली. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की शासन आपल्या दारी कार्यक्रमाबाबतचे पत्र मला मिळाले. हे म्हणणे खरे नाही की मी आर्टीकल अ वर असलेला दस्तऐवज खोटा दाखल केलेला आहे.

८. सभा मंडपाच्या समोर एकूण १६ सेक्टर होते. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की फिर्यादीने घटनास्थळ दाखविले व मी पंचासमक्ष पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीविरुध्द कोणताही पुरावा नसतांना मी खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की मी पंच मिळण्याबाबत कोणत्याही कार्यालयाला पत्र व्यवहार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी बयाने नोंदविले नाही.

९. मी श्री. वनारे यांचे बयान नोंदविले होते. श्री. वनारे यांनी बयान देतांना सांगीतले नव्हते की *"त्या व्यक्तींना आम्ही घोषणाबाजी करण्यास अटकाव केला".* हे म्हणणे खरे नाही की मी श्री वनारेचे बयान नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा स्टेशन डायरी उतारा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा तपास केला व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी–काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

(पी.एस.इंगळे)

दिनांक – १४/०१/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.